पोलीस स्टेशन, गडचांदूर जि. चंद्रपूर (म.रा.)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर　　**P.S.(ठाणे):** गडचांदुर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0473　　**Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/09/2026 00:49

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार　　**Date From (दिनांक पासून):** 07/09/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/09/2026

**Time From (वेळेपासून):** 16:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/09/2026　　**Time (वेळ):** 19:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/09/2026 00:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 3 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आपले सरकार सेवा केद्र,तलाठी कार्यालय परिसर, गडचांदुर,कोरपना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोष नरसिंगराव पटकोटवार
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वैशाली नगर वार्ड न 6,गडचांदुर,कोरपना,गडचांदुर ,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वैशाली नगर वार्ड न 6,गडचांदुर,कोरपना,गडचांदुर ,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888794594

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन रामक्रूष्ण खैरे | | | 1. बार्ड क्र 3,गडचांदुर ,कोरपना, गडचांदुर ,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | रिअलमी कंपनीचा जुना वापरता मोबाईल | 15,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान | इतर कोणतीही कागदपत्रे | उत्पन्नाचा दाखल्याकरीता केलेला | 0.00 |

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| | रोखे | | अर्जाची प्रत | |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | उत्पन्नाचा दाखला व पावती | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50 रुपये दराचे 03 चलनी नोटा | 150.00 |
| 5 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | SanDisk कंपनीचे 32GB क्षमतेचे 02 नग मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,150.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
पोलीस स्टेशन, गडचांदुर जि. चंद्रपूर
दिनांक ०७/०९/२०२०
माझे नाव प्रशांत नानाजी केदार, वय ४३ वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर, मो.क. ८७८८७२३७६५
समक्ष पोलीस स्टेशन गडचांदुर, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी माहे जुन /२०२६ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.
दिनांक ०७/०९/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ १२/०० वा. दरम्यान एक तक्रारदार कार्यालयात हजर येवून लाच मागणी संबधाने तक्रार असल्याचे सांगितले वरून तक्रारदारास त्यांचे नाव पत्ता व तक्रारी संबधाने विचारणा केली असता तक्रारदाराने आपले नाव श्री. संतोष नरसिंगराव पटकोटवार, वय ५२ वर्षे, धंदा- बांबु व्यवसाय रा. वार्ड न. ६, वैशाली नगर, गडचांदुर ता. कोरपना ता. जि. चंद्रपूर असे सांगून त्यांना सुचीत केलेवरून त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली
सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोहवा/रविकांत इंगळे यांचे हस्ते मा. जिल्हा अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय चंद्रपूर यांना पत्र देवून दोन शासकीय पंच नामे श्री. केतन राम राठोड, वय ३५ वर्षे, भूकरमापक व कु. जयश्री राधेश्याम भलावी वय २७ वर्षे, भूकरमापक दोन्ही उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.
त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. संतोष नरसिंगराव पटकोटवार, यानी एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने दिलेल्या तक्रारीनुसार नमूद ईलोसे याने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क. १) श्री. केतन राम राठोड, भूकरमापक व पंच क. २) जयश्री राधेश्याम भलावी, भूकरमापक हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.
सापळा पार्टीतील सदस्य पोहवा/रविकांत इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोहवा/विजेंद्र वाढई, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि. चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार श्री. संतोष नरसिंगराव पटकोटवार यांचीच ईलोसेविरूध्द तकार असल्याचे सांगण्यात आले.

त्यांनतर आम्ही, तक्रारदार श्री. संतोष नरसिंगराव पटकोटवार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली असून तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.
"माझे नाव :- श्री. संतोष नरसिंगराव पटकोटवार, वय ५२ वर्षे, धंदा बांबु व्यवसाय रा. वार्ड न. ६, वैशाली नगर, गडचांदुर ता. कोरपना ता.जि. चंद्रपूर मो.क. ८८८८७९४५९४

सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वरिल पत्यावर माझ्या परिवारासह राहत असून बांबु पासून बनविलेले साहीत्य विक्रीचे काम करतो. माझ्या दोन मुली असून मोठी मुलगी कु. ईशा वय २२ वर्षे व लहान मुलगी कु. संस्कुती वय १७ वर्षे असे आहेत. माझी लहाण मुलगी कु. संस्कुती हिचे शैक्षणिक कामकाजाकरीता उत्पन्नाचा दाखला आवश्यक असल्याने तो दाखला काढण्याकरीता मी दिनांक ३१/८/२०२६ रोजी दुपारी १२/०० वा. दरम्यान गडचांदुर येथील तलाठी कार्यालय परिसरात असलेल्या सेतु केंद्रात गेलो. तेथे सेतु केंद्राचे संचालक श्री. सचिन खैरे यांना उत्पन्नाच्या दाखल्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे त्यांचेकडे दिली. त्यावेळी त्यांनी मला उत्पन्नाचा दाखला घेण्यास येतांना २००/-रू घेवून येण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना तुमच्या सेतु केंद्राचे बाहेरील बोर्डवर उत्पन्नाच्या दाखल्याकरीता ६९/-रू इतकेच लिहीलेले आहे, तरी तुम्ही दोनशे रूपये म्हणत आहे त्याची पावती मिळणार का? असे विचारले तर त्यांनी "नाही, तुम्हाला २००/- रूपयेच दयावे लागतील, जास्तीच्या पैश्याची कोणतीही पावती मिळणार नाही, जर दोनशे रूपये दिले नाही तर उत्पन्नाचा दाखला तयार करून देणार नाही" असे म्हणाल्याने मुलीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणुन मी नाईलाजास्तव "ठिक आहे, पाच-सहा दिवसांनी दाखला घेण्यास येतो." असे म्हणुन तिथुन निघून गेला.

मला श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र (सरकार मान्य), गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांना त्यांनी मागणी केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठी अधिकृत फी ६९/- रू व्यतिरिक्त १३१/- रूपये लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी दुपारी १२/०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन आपणास भेटून वरिल प्रमाणे हकीकत सांगून लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता आपण मला लेखी तक्रार देण्यास सांगितले. त्यावरून मी आपणास माझे हस्ताक्षरात श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र (सरकार मान्य), गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांचे विरूध्द लेखी तक्रार देत आहे. गैरअर्जदार यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे वैयक्तिक बचतीतील उत्पन्नाच्या दाखल्याची अधिकृत फी ६९/- रू व त्याव्यतिरिक्त गैरअर्जदाराने मागणी केलेले १३१/- रू लाच रक्कम असे एकुण २००/-रू वापरण्याकरीता आपणाकडे देत आहे.

तरी शासनाने आपले सरकार सेवा केंद्रावरील अर्जाची व इतर शासकीय कामाचे दर निश्चित केले असतांना सुध्दा माझ्या मुलीच्या शैक्षणिक कामाकरीता माझे उत्पन्नाचा ऑनलाईन दाखला काढून देण्याच्या कामाकरीता अधिकृत फी ६९/- रू व्यतिरिक्त १३१/- रूपये लाच रक्कम असे एकुण २००/-रूपयाची मागणी करणारे श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र, तलाठी कार्यालय परिसर, गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांचेविरूध्द कार्यवाही होणेस विनंती आहे."
अशाप्रकारे तक्रारदाराने दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तत्पूर्वी आम्ही सदर तक्रारीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे पोर्टवरील शासन निर्णय क्रमांक आसेकें-१७२५/प्र.क्र. ८६/मातं (३९) दि. २७/०३/२०२६ मधील 'शासन निर्णय' या मथळ्याखाली मुद्दा क. २ 'सेवा दराच्या वाढीबाबत' या मुद्यामध्ये अर्जाची फी १०/-रू. असल्याचे नमुद आहे. याव्यतिरीक्त १०/-रू. शासकीय शुल्क, ४.५/-रू (९ टक्के) राज्य जीएसटी व ४.५/-रू. (९टक्के) केंद्र जीएसटी अशाप्रकारे एकुण फी ६९/-रू सेतु केंद्र अर्जदारांकडून आकारणे अपेक्षीत असल्याबाबत आम्ही खात्री केली. सदर शासन निर्णयाची प्रत कागदपत्रात समाविष्ट केली आहे.
त्यांनतर तक्रारदार यांचेकडील लाचेत वापरण्यात येणारे २००/-रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही punchani सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. तक्रारदार यांनी हजर केलेल्या ५०/-रू दरांच्या ०३ नोटा असे १५०/- रूपये व २०/- रू दरांच्या ०२ नोटा असे ४०/- रूपये व १० रू दराची ०१ नोट असे एकुण २००/- रूपयांचे क्रमांक पंच क्रं. १ यांनी वाचले पंच क्र. २ यांनी पडताळून पाहिल्या.
५०/- रू दरांच्या ०३ नोटा- 0PG 765209, 6AD 853976, 9FM 406142

२०/- रू दरांच्या ०२ नोटा-86P 192230, 67M 449551
१०/- रू दराची ०१ नोट-55D 426977
त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोगाबाबत माहीती देवून अॅथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला निळसर रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पोहवा/विजेंद्र वाढई यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर पोहवा/विजेंद्र वाढई यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. तसेच आमचे कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पोशि/राकेश जांभुळकर यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली असून याबाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आलेली आहे.
त्यानंतर तक्रारदाराने तक्रारीत सांगितल्याप्रमाणे श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांना आज रोजी सेतु केंद्रात दाखल्याकरीता जावून भेटतो असे सांगितले असल्याने पुढील पडताळणी/सापळा कार्यवाही गडचांदुर येथे जावून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आल्या).
त्यानंतर लाच मागणी पडताळणी/सापळा कार्यवाही करीता आम्ही, ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, नविन मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रकमेचा लिफाफा व स्टेशनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटॉप, लॅपटॉपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेवून आम्ही, सोबत दोन्ही पंच, पोहवा/हिवराज नेवारे पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, असे शासकिय वाहन क्र. MH 34 CJ 1533 ने, व पोहवा/रवीकुमार इंगळे, पोशि/प्रदिप ताडाम, मपोशि/मेघा मोहुर्ले असे शासकीय वाहन क. MH 34 8788 मध्ये बसलो व तक्रारदाराने सोबत आणलेली वेस्पा कंपनीची मोपेड वाहन क. MH 34 CA 9424 ही आमचे वाहनाचे मागेमागे आणण्यास तक्रारदारास सांगून १५/०० वा. ला.प्र.वि. चंद्रपूर येथून रवाना होवून भोयगाव मार्गे गडचांदुर परिसरातील निर्जन स्थळी १६/४० वा. दरम्यान पोहचलो. त्यांनतर तक्रारदाराचे तक्रारीबाबत सर्वाना थोडक्यात सांगून तक्रारदार व पंच तसेच सापळा पथकास पडताळणी कार्यवाहीबाबतच्या सुचना दिल्या.
त्यानंतर श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र गडचांदूर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांची लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, पडताळणी कार्यवाही अनुषंगाने पंच क १ यांचे हस्ते तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.
त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र. ०१ यांना गैरअर्जदारांची प्रत्यक्ष भेट घेवून सत्यता पडताळणी करण्याकरीता पाठवितांना पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच क. १ यांना सविस्तर सुचना दिल्या. सापळा पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी SanDisk कंपनिचे 32GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5137XV83255S असे प्रिंट असलेले नवीन मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ १६/५४ वा. रेकॉर्डीग सुरू करून पंच क्रं. ०१ यांचे आवाजात तक्रारदार यांचेसह लाचेच्या पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. १ यांना वेळ १६/५६ वा. तक्रारदाराने सोबत आणलेल्या वेस्पा कंपनीची मोपेड क. MH 34 CA 9424 वाहनानी रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. २ आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी तक्रारदार यांची परत येण्याची वाट पाहत थांबून राहीलो
त्यानंतर तक्रारदार हे पंच १ यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी वेळ १७/०६ वा. परत आल्यावर आमचे सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी तक्रारदाराचे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढल्यानंतर पंच क्र. १ यांच्या आवाजात वेळ १७/०८ वा. बंद केले. त्यांनतर पंच क्र. १ यांचे कडुन तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.
त्यानंतर पंच क. १ श्री. केतन राठोड यांना घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदारासह त्यांचेकडील वेस्पा कंपनीची मोपेड क. MH 34 CA 9424 वाहनाने गैरअर्जदार यांचे आपले सरकार सेवा केंद्रात गेलो तेथे खुर्चीवर बसून असलेल्या इसमास तक्रारदाराने सचिन म्हणुन विचारून त्याचे सोबत बोलणे सुरू केल्याने गै.अ. असल्याचे मला समजले. त्यांनतर तक्रारदाराने त्यांचे उत्पन्नाचा दाखला बाबत विचारणा केली असता गै. अ. याने उत्पन्नाचा दाखला तयार असल्याचे सांगून दोनशे रू असे म्हटल्याने तक्रारदाराने "दोनशे

रूपये आहे का, कमी आहे रेट, एकोनसत्तर आहे खर न," असे म्हटले असता गै.अ. याने "कमी आहे तेवढयात का भेटते जी" असे म्हणाले. त्यांनतर तक्रारदारानी गै.अ. सचिन खैरे यांचेशी पैश्याबाबत तडजोड केली असता गै.अ. सचिन खैरे यांनी दिडशे रूपयाची मागणी केली असता तक्रारदाराने त्यास "पावती देते का दिडश्याची तु" असे म्हणाले तर गै.अ. सचिन खैरे यांनी " नाही, जेवढी निघेल तेवढी एकोनसत्तरची" असे म्हणाला तेव्हा तक्रारदाराने ठिक आहे असे म्हणुन पैसे विसरल्याने आणुन देतो असे सांगून आम्ही तिथून निघून आपण थांबून असलेल्या ठिकाणी तक्रारदाचे वाहनाने परत आलो असे सांगितले. त्यावर तक्रारदार याने पंच क. १ यांनी वरील सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.

सदर संभाषण व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये " FOLDER01" मधील फाईल क 260907_1654 मध्ये रेकॉर्ड झाले असून सदर संभाषण लॅपटॉपमध्ये कॉपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क. १ व तक्रारदाराने सांगितलेल्या हकीकत व त्यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरून तसेच तक्रारदार व गैरअर्जदार यांचे ऐकलेल्या संभाषणावरून गै. अ. श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र (सरकार मान्य) गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांनी तक्रारदारास त्यांचा मुलीच्या शैक्षणिक कामाकरीता आपले सरकार पोर्टल मार्फत उत्पन्नाचा ऑनलाईन दाखला काढून देण्याच्या कामाकरीता अधिकृत फी ६९/- रू व्यतिरिक्त १३१/- रूपये लाच रक्कम असे एकुण २००/-रूपयाची मागणी करून तडजोडीअंती १५०/-रू स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे आमचे व दोन्ही पंचांचे स्पष्ट मत झाले. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना पंच क. १ यांचेसह गै.अ. श्री. सचिन खैरे, संचालक, आपले सरकार सेवा केंद्र गडचांदुर ता. कोरपणा जि. चंद्रपूर यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्याचा सर्वानुमते निर्णय घेतला. सदर कार्यवाही संपताच शब्दःश स्क्रिप्ट तयार करण्याची तसेच पडताळणी कार्यवाही मेमरी कार्डची हॅशव्हॅलु काढल्यानंतर जप्ती करण्याची तजवीज ठेवली आहे.

त्यांनतर सापळा कार्यवाही पुर्वी तक्रारदार यांची पंच क्र. १ यांचे हस्ते अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क. १ व २ यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क. २ यांनी लाच रक्कम ५० रू. दराच्या ०३ चलनी नोटा असे १५०/- रुपये आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवले. उर्वरित २०/- रू दराच्या 86P 192230, 67M 449551 व १०/- रूपये दराची 55D 426977 नोटा वेगळ्या लिफाप्यात ठेवण्यात आले. तसेच प्रात्यक्षिक पंचनामा कार्यवाहीवेळी आम्ही ताब्यात घेतलेली नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेल्या प्रतीमधील २०/-रू दराच्या 86P 192230, 67M 449551 व १०/- रूपये दराची 55D 426977 नोटांवर पेनीने रेघ ओढून प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतली. त्यांनतर पंच क. २ यांनी साबण पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले. सापळा कार्यवाही संपताच तक्रारदार यांना उर्वरित दोन नोटा परत करून पोचपावती लिहून घेण्याची तजवीज ठेवली आहे

त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5137XV83255S असे प्रिंट असलेले मेमरी कार्ड मध्ये फाईल क. 260701_1654 व्यतीरीक्त इतर कोणतीही फाईल नसल्याबाबत खात्री करून दिली. तसेच पोहवा / रविकांत इंगळे यांना लाचरक्कम जप्तीचे व्हिडीओ चित्रीकरण्याबाबत सुचना दिली असता त्यांनी कार्यालयीन SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरामध्ये SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5411XV8718UA असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड टाकुन त्याचे ताब्यात घेतले.

त्यानंतर पोशि/राकेश जांभुळकर यांनी वरीलप्रमाणे मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हाईस रेकॉर्डरमधील १७/२२ वा. रेकॉर्डीग सुरू करून पंच क. ०१ यांचे आवाजात सापळा कार्यवाही प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदाराचे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. १ यांना वेळ १७/२४ वा. तक्रारदाराचे मोपेड दुचाकी वाहनाने रवाना केले. त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. २ व पोहवा/रविकांत इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर असे सोबत असलेल्या दोन्ही शासकीय वाहनाने तक्रारदाराचे वाहनाचे मागेमागे गेलो तेव्हा तक्रारदार हे तलाठी कार्यालय परिसरातील आपले सरकार सेवा केंद्राजवळ आपले वाहन थांबवतांना दिसल्याने आम्ही आमचे दोन्ही वाहन अलीकडेच थांबून वाहनातच बसून गै.अ. यांचे सेतु केंद दिसणार व कुणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो. काही वेळानी तक्रारदार हे गै.अ. याचे सेतु केंद्राबाहेर येऊन त्याचे गळयातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा डाव्या हातानी काढून गै. अ. याने लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही तसेच सोबत असलेले पंच क. २ व स्टॉफ हे वाहनातुन उतरून घटनास्थळी आलोत व तक्रारदारास बाजुला थांबून राहण्याबाबत इशारा करून गैरअर्जदार यांना त्याचे खुर्चीवर बसवून आम्ही, पंच क. ०१ यांना लाच रक्कम कुणी

स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी खुर्चीवर गै.अ. यांचेकडे बोट दाखवून सदर इसम गै.अ. श्री. सचिन खैरे, असून त्यांनीच लाच रक्कम तक्रारदाराकडून स्विकारून समोरील टेबलवर ठेवल्याचे सांगितले. दरम्यान पोशि/राकेश जांभुळकर यांचे हस्ते पंच क्र. १ यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर १७/३५ वा बंद करण्यात आले.
आम्ही गै.अ. सचिन खैरे यास सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगून त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता इ. माहिती विचारली असता उसने आपले नाव सचिन रामकृष्ण खैरे, वय ४० वर्षे, धंदा संचालक, आपले सरकार सेवा (सरकार मान्य) केंद्र, तलाठी कार्यालय परिसर गडचांदुर जि. चंद्रपूर रा. गडचांदुर वार्ड क. ३ ता. कोरपना जि. चंद्रपूर असे सांगितले.
त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र. १ यांनी प्रात्यक्षिक पंचनाम्यामध्ये नमूद असलेल्या व पडताळणी नंतर काढून ठेवलेल्या नोटां व्यतिरीक्त लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांक वाचून पाहीले व पंच क्र. २ यांनी टेबलवर मिळालेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता (ज्यात ५०/- रू दरांच्या ०३ नोटा) असे १५०/- रूपये रूपयांचे क्रमांकाशी जुळुन आले. त्यानतर आपले सरकार सेवा केंद्रातील सर्व लाईट बंद करून प्रकाशाची तिव्रता कमी करून आमचे सुचनेवरून पोशि/अमोल सिडाम यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात आम्हा सर्वाचे हात तपासले असता कोणाचाही हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून येत नसल्याची गै. अ. सचिन खैरे यांना खात्री करून देवून गै. अ. सचिन खैरे यांनी टेबलवर ठेवलेल्या नोटांना अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता नोटांना निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने आमचे व दोन्ही पंचाची लाच रक्कम असल्याची खात्री झाली. सदर नोटा पंच क. २ यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यांनतर गै.अ. सचिन खैरे यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटाला निळसर रंगाची चकाकी दिसून आली.
नमुद लाच रक्कम लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिलबंद केल्यानंतर लाच रक्कमेचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचांनी सहया केल्या.
त्यानंतर गै.अ. सचिन खैरे यांची अंगझडती घेवून अंगझडतीत मिळुन आलेला वस्तुची वेगळी यादी तयार करण्यात आली. अंगझडतीत मिळून आलेले साहित्य व रोख रक्कम त्यांना वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर आम्ही, दोन्ही पंच आणि गै.अ. सचिन खैरे यांनी स्वाक्षरी केलेली आहे. गै.अ. सचिन खैरे यांचे मोबाईल व तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदाराचे उत्पन्नाचा दाखला काढण्याकरीता दिलेले अर्ज आम्ही तपासकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्याची तजवीज ठेवली. सदर बाबतची व्हिडीओ रेकॉडीग करण्यात आली. त्यांनतर तक्रारदाराचे दोन्ही हात व त्यांनी परिधान केलेल्या शर्ट अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटांना व शर्टचे समोरील डाव्या बाजुचे खिश्याला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.
सदरचे घटनास्थळ हे आपले सरकार सेवा केंद्र, वार्ड क्र. ३, नविन तलाठी कार्यालय परिसर गडचांदूर ता. कोरपना जि. चंद्रपूर येथिल आहे. त्यानंतर आम्ही पोशि/प्रदीप ताडाम यांना घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढण्याबाबत सुचना देवून कार्यवाहीदरम्यान कोण कुठे होते त्याबाबत सविस्तर सागितले असता त्यांनी सदर घटनास्थळाचा कच्चा नकाशा तयार केला. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या. सदरचे ठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन गडचांदुर जवळच असल्याने आम्ही पुढील पंचनामा कार्यवाही करिता पो. स्टे गडचांदुर येथे जाण्याचे ठरवून १८/२० वा. तिथे पोहचलो.
त्यांनतर तक्रारदाराची पंच क. १ यांचे हस्ते अंगझडती घेवून मिळालेले साहीत्य व रोख रक्कमेच्या नोंदी घेतल्यानंतर मिळालेले साहीत्य परत करण्यात आले. तक्रारदार दोन्ही पंच व आम्ही अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली. तसेच सापळावेळी गै.अ. सचिन खैरे यांनी तक्रारदारास दिलेले उत्पन्नाचा दाखला व पावतीची छायांन्कीत प्रत जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून कागदपत्रात समाविष्ट करण्यात आली आहे.
यानंतर आम्ही, पंच क. १ श्री. केतन राठोड यांना सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गै.अ. सचिन खैरे यांच्यात लाच देवाण घेवाण झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच १ यांनी सांगितले की, "मी तक्रारदारासह त्याचेकडील वेस्पा कंपनीची मोपेड क. MH 34 CA 9424 वाहनाने गै.अ. सचिन खैरे यांचे आपले सरकार सेवा केंद्रात गेलो तेव्हा गै.अ. सचिन खैरे यांनी तक्रारदारास उत्पन्नाचा दाखला देत दोन बोटांनी ईशाऱ्याने पैसे मागितले असता तक्रारदाराने आपले शर्टचे डाव्या खिश्यातुन उजव्या हाताने पैसे काढून गै.अ. सचिन खैरे यांचेकडे देत पैश्याची रिसीप्ट मागितली. तेवढयात तक्रारदारास उत्पन्नाचा दाखल्यामध्ये त्यांचे नाव "शरद पटकोटवार" असल्याचे दिसून आल्याने त्यांनी गै.अ. सचिन खैरे यास "अरे यार नाव चुकलय, शरद आलय, संतोष याच त, असे म्हणत दाखला गै.अ. यांचेकडे परत दिला. तेव्हा गै.अ. सचिन खैरे यांनी "डबल टाका लागते चुकले जी" असे म्हणुन बाजुला असलेल्या महिलेचे अर्जेट काम असल्याचे सांगून नंतर डबल काढुन देण्याचे सांगितल्याने तक्रारदाराने

त्यांचेकडे पैसे देत हे घे, मोजून घे असे म्हणुन पैसे दिले असता गै.अ. सचिन खैरे यांनी पैसे उजव्या हातानी स्विकारून समोरील टेबलवर ठेवले व गै.अ. सचिन खैरे याने तक्रारदारास उत्पन्नाचा दाखला परत दिल्यानंतर आम्ही सेवा केंद्राच्या बाहेर आलेवर तक्रारदारानी सापळा पथकास नियोजीत इशारा करताच आपण त्याठिकाणी आले" असे सांगितले. त्यावरून तक्रारदार याने पंच क. १ यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.
आमचे सुचनेनुसार सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे गळयात अडकवून पाठविलेले व्हाईस रेकॉर्डर पोशि/राकेश जांभुळकर यांनी लॅपटॉपला कनेक्ट केले असता मेमोरी कार्डमध्ये FOLDER 01 मध्ये पडताळणी कार्यवाहीची 260907_1654 व सापळा कार्यवाहीची 260907_1722 या नावाच्या दोन फाईल दिसून आल्या. सदर सापळा कार्यवाहीची 260907_1722 नावाची फाईल कॉपी केल्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार यांचेसमक्ष व्हॉईस फाईल फॉरवर्ड करुन ऐकली.
त्यानंतर मेमरीकार्ड मधील पडताळणी कार्यवाहीची व्हाईस फाईल 260907_1654 व सापळा कार्यवाहीची व्हाईस फाईल 260907_1722 लॅपटॉपमधील Sevenza Hash Calculator या सॉफ्टवेअरद्वारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर दोन्ही पंचानी व पोशि/राकेश जांभुळकर यांनी सहया केल्या आहेत. सदर सापळा कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5137XV83255S असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवून जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिलबंद केले.
तसेच आमचे सुचनेवरून पोहवा / रविकांत इंगळे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. सचिन खैरे यांचे टेबलवरील लाच रक्कमेची जप्ती व त्याची अंगझडती कार्यवाहीचे चित्रीकरणाचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5411XV8718UA असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरा लॅपटॉपला कनेक्ट केले असता MP_ROOT या मध्ये MAH00001.MP4 या नावाच्या व्हिडीओ फाईल दिसुन आली. त्या फाईलचे Sevenza Hash Calculator सहायाने हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढली. त्यावर दोन्ही पंचानी व पोहवा/रविकांत इंगळे यांनी सही केल्यानंतर कागदपत्रात समाविष्ट केली. सदर फाईल्स असलेले सदरचे मेमरी कार्ड एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवले. सदर लिफाप्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केल्यावर लिफापा लाखेने सिलबंद करुन आम्ही आमचे ताब्यात घेतला.
त्यानंतर गै.अ. सचिन खैरे यांना झालेल्या पडताळणी / सापळा कार्यवाहीबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद आणि पेन त्यांना उपलब्ध करून दिले. त्यावरुन त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.
त्यानंतर गै.अ. सचिन खैरे यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेला रिअलमी कंपनीच्या मोबाईलची पाहणी करून मोबाईल लिफाप्यात ठेवून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै.अ. सचिन खैरे यांनी सहया केल्यात. तसेच तक्रारदाराचे तक्रारीसंबंधी गै.अ. सचिन खैरे यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेले उत्पन्नाचे दाखल्याचा अर्ज व दाखल्याकरीता भरणा केलेली पैसे दिल्याची पावती जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून कागदपत्रात समाविष्ट करण्यात आली.
तरी यातील ईलोसे सचिन रामकृष्ण खैरे, वय ४० वर्षे, धंदा संचालक, आपले सरकार सेवा (सरकार मान्य), तलाठी कार्यालय परिसर, गडचांदुर, जि. चंद्रपूर रा. गडचांदुर वार्ड क. ३ ता. कोरपना जि. चंद्रपूर यांनी शासनानी आपले सरकार सेवा (सरकार मान्य) केंद्रावरील अर्जाची व इतर शासकीय कामाचे दर निश्चित केले असतांना सुध्दा तक्रारदाराचे मुलीच्या शैक्षणिक कामाकरीता त्यांचे उत्पन्नाचा ऑनलाईन दाखला काढून देण्याकरीता शासकीय अधिकृत फी ६९/- रू व्यतिरिक्त १३१/-रू लाच रक्कम असे एकुण २००/-रूपयाची मागणी करून तडजोडीअंती १५०/- रू स्विकारल्याने त्यांचेविरुधद भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (सुधारणा २०१८) कलम ७ अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिर्याद आहे.
(प्रशांत एन. केदार)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

shivaji bhimrao kadam(I (Inspector)) / 1979 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shivaji bhimrao kada

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1979

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्टेशन डायरी अमलदार
पोलीस स्टेशन, गडचांदूर

(बंडु श्यामराव मालने)
पोहवा/2426 पो स्टे गडचांदूर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**